# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग नागपूर ४४० ००१

जा. क्र.मपमविवि/आस्था/विधी/ ४५१० /२०१७ दिनांक :- ३० / ११ /२०१७

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठासाठी कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार नियुक्त करणेबाबत जाहिरात**

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आणि त्याची घटक महाविद्यालये/ प्रक्षेत्रे यांसाठी मा सर्वोच्च न्यायालय, मा उच्च न्यायालय मुंबई, व खंडपीठ नागपूर, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट), महाराष्ट्रातील विविध औद्यागिक / कामगार/ दिवाणी न्यायालये/ मंच येथे दाखल करणेत आलेल्या/ येणा-या/ प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणामध्ये विद्यापीठाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी परिच्छेदनिहाय जबाब तयार करून विद्यापीठ विधिज्ञास सोपविणेकरीता व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यास मदत व्हावी तसेच विद्यापीठातील विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाहीबाबतची प्रकरणे निकाली काढणे, विविध न्यायालयीन प्रकरणांचा संदर्भ देवून विधी सल्ला पुरविणे या दृष्टीकोनातून कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार नियुक्त करणेबाबतची बाब विद्यापीठाच्या विचाराधीन असून खालील अटीचे अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत. अर्ज दाखल करणेची अंतिम दिनांक **२७/ १२/२०१७** पर्यत राहिल. सदरचे अर्ज सार्वजनिक सुट्टी व रविवार खेरीज कार्यालयीन वेळेत स्विकारले जाईल.

| अ.क्र. | पदनाम | एकत्रित अनुज्ञेय मानधन दरमहा ( दुरध्वनी व वाहन भत्ता मिळून) |
|---|---|---|
| १ | विधी सल्लागार | एकुण रू २५,०००/- |

**अ) शैक्षणिक अर्हता व अनुभव :**

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.

२) विधी सल्लागार या पदासाठी मा.उच्च न्यायालयात वकिली व्यवसायाचा किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, विद्यापीठविषयक, प्रशासनिक मालमत्ता विषयक अशा सर्व प्रकरणातील कायद्याच्या बाबी तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक आहे.

५) विधी सल्लागार करीता उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ५० वर्षापेक्षा जास्त नसेल.

**ब ) सर्वसाधारण अटी -**

६) विधी सल्लागाराची नेमणुक प्रथमतः ६ महिन्यासाठी (एकत्रित दरमहा मानधन रू.२५,०००/- दूरध्वनी व वाहन भत्ता मिळुन) करार व कंत्राटी पध्दतीने ठोक रक्कमेवर करणेत येईल.

७) विधी सल्लागाराची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल व ते विद्यापीठ कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

८) सहा महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढवता येईल. तथापी अशी मुदत अठरा महिन्यापेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती केली जाईल. त्यानंतर नियुक्ती करणे आवश्यक वाटल्यास त्या उमेदवारांस पुनःश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

९) निवड झालेल्या उमेदवारांने विहित प्रपत्रात करार करून देणे बंधनकारक राहील.

१०) करारपध्दतीने नियुक्त केलेल्या विधी सल्लागारास एकत्रित मानधन (दुरध्वनी व वाहन भत्ता मिळून) इ. व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.